बुधवार दि.२ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ३०
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

## २०२९ मध्ये स्वबळावरच सत्ता- अमित शहा

# राज्यात लोकसभेपेक्षा १० टक्के मतदान वाढवण्याचे दिले टास्क

## भाजपमधील मतभेद मिटवण्याची सर्वच नेते, पदाधिकाऱ्यांना दिली तंबी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

'आपण देशात तिसऱ्यांदा सरकार बनवले आहे. त्यामुळे लोकसभेला महाराष्ट्रात आलेली निराशा झटकून टाका. कोणत्याही सर्व्हेचा विचार करू नका. या वेळीही राज्यात महायुतीचेच सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेष आहे. एकदा का महाराष्ट्रात आपले सरकार आले की समान नागरी कायदा आणण्यापासून आपल्याला कुणीही रोखू शकत नाही,' असा विश्वास भाजपचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी मुंबईत व्यक्त केला. इतकेच नव्हे तर २०२९ मध्ये भाजपला स्वबळावर सत्ता आणायची आहे, असे आव्हानही त्यांनी आपल्या पक्ष कार्यकर्त्यांना दिले आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईमध्ये आयोजित मेळाव्यात ते बोलत होते.

२०२९ मध्ये भाजप स्वबळावर सत्ता आणेल, या अमित शाह यांच्या घोषणेने महायुतीतील मित्रपक्ष शिंदेसेना व अजित पवार गट अस्वस्थ झाला आहे. यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, 'प्रत्येकाला आपला पक्ष वाढवण्याचा अधिकार आहे. पण इतर राज्ये व महाराष्ट्राची परिस्थिती वेगळी आहे. इथे १९८५ नंतर सुमारे ४० वर्षांत कधीच एका पक्षाचे सरकार आले नाही. कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी नेत्यांना असे बोलावेच लागते.'

शाह म्हणाले, केवळ हारतुरे घालून निवडणूक जिंकता येत नाही. प्रत्येक बूथवर १० टक्के मतदान वाढवण्यासाठी प्रयत्न करा. असे झाले तर मग आपल्याला सत्तेवर येण्यापासून कुणी रोखू शकत नाही.

जे भाजपचे मतदार नाहीत, त्या कुटुंबांशी संपर्क साधून त्यांना आपलेसे करा. आपल्या सरकारने केलेल्या चांगल्या कामाची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवा.

महाराष्ट्राची निवडणूक देशाची दशा व दिशा बदलणारी निवडणूक आहे. त्यामुळे नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आपापसातील मतभेद संपवावेत. कोणत्याही नेत्या, पदाधिकाऱ्यापेक्षा पक्ष मोठा असतो. आपला पक्ष सत्तेत येण्यासाठी काम करत राहा.या दौऱ्यात शाह यांनी कोपरखैरणे येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जुन्या स्वयंसेवकांशीही बंदद्वार चर्चा केली. लोकसभा निवडणुकीत संघाचे स्वयंसेवक फारसे सक्रिय न राहिल्याने भाजपला मोठा फटका बसला. आता विधानसभेसाठी त्यांना सक्रिय करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.'महाराष्ट्रातील प्रश्न सोडवण्यासाठी देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत' असे सांगून अमित शाह यांनी तूर्त फडणवीसांना दिल्लीत नेण्याचा कुठलाही विचार नसल्याचे संकेत दिले. प्रदेश भाजपचे नेते निवडणुकीबाबत जी रणनीती आखतील ती अगदी मंडल, बूथ, वॉर्ड स्तरापर्यंत राबवा. आपला बूथ पातळीवरचा कार्यकर्ता जितका जोमाने काम करेल, तितका आपला विजय नक्की. केंद्र व राज्यातील सरकारने देशाच्या विकासासाठी मोठे काम केले. महाराष्ट्राला आणखी प्रगतिपथावर न्यायचे आहे, त्यामुळे महायुतीचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येतील, यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन शाह यांनी केले.



# उपविभागातील अवैध दारुचे दुकाने बंद करा-बार चालकांची मागणी

## उपविभागीय पोलिस अधिकारी यांना दिले निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार | विनायक कुटे**

मेहकर व लोणार तालुक्यातील परवाना धारक वाईन बार असोसिएशनच्या वतीने मेहकर व लोणार तालुक्यातील सर्व धाबे,खानावळ,पानपट्टी तसेच छोट्या मोठ्या हॉटेलवर अवैध पणे सबंधित विभागाच्या आशीर्वादाने सर्रासपणे अवैध देशी व विदेशी दारू विक्री जोमात सुरु असून त्याचा परिणाम परवानाधारक वाइन बार चालकांच्या व्यवसायावर झाला आहे त्यामुळे ही अवैध देशी व विदेशी दारू विक्री तत्काळ बंद करण्यात यावी अशी मागणी मेहकर लोणार तालुक्यातील वाइन बार असोसिएशनच्या वतीने उपविभागीय पोलिस अधिकारी यांचेकड़े निवेदनाद्वारे करण्यात आली आहे



या संदर्भात पोलिस उपविभागीय पोलिस अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की आम्ही लाखो रुपये खर्च करून शासनाचा परवाना घेऊन बांधकाम करतो व्यवसाय सुरु करतो सर्व नियमांचे पालन करतो परंतु मेहकर व लोणार तालुक्यातील सर्व धाबे,खानावळ व पानपट्टी येथे अवैध देशी व विदेशी दारुची विक्री होत आहे त्यामुळे आमच्या व्यवसायावर परिणाम होत असून आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे नुकतेच किंनगाव जट्टू येथील परवानाधारक हॉटेल दर्श वाइन बारचे मालक यांना अवैध देशी व विदेशी दारु विक्रेत्याने जीवे मारण्याची धमकी दिली आहे त्याच्या जिवाचे काही बरे वाइट झाल्यास याची जबाबदारी प्रशासनाची राहील आम्ही परवाना धारक शासनाला करोड़ो रूपयांचा महसूल देत आहोत त्या उलट अवैध दारू विक्रेते शासनाचा महसूल बुडवत आहेत तरी आपण तत्काळ या सर्व अवैध देशी व विदेशी दारू विक्रेत्यावर कड़क कारवाई करावी अन्यथा आम्ही लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करू याची नोंद घ्यावी निवेदनावर मेहकर लोणार तालुक्यातील सर्व परवाना धारक वाइन बार चालकांच्या स्वाक्षरी आहेत

# मोदी आवास घरकुल योजने अंतर्गत उद्दिष्टे वाढवून पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळवून द्यावा-नागनाथ माळगे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद | साहेबराव दुगाने**

पंतप्रधान मोदी आवास योजना अंतर्गत धर्माबाद तालुक्यामध्ये अनेक लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळाला पण तयातीलच काही लाभार्थ्यांना मुदतीच्या आत जातीचे प्रमाणपत्र राशन कार्ड व इतर आवश्यक कागदपत्र गोळा करण्यासाठी विलंब झाला त्यामुळे घरकुलासाठी आवश्यक असणारी कागदपत्र ठराविक कालावधी गोळा करून संबंधित ग्रामपंचायतिकडे जमा केले नसल्याने तालुक्यातील अनेक पात्र लाभार्थी हे घरकुलापासून वंचित राहिले आहेत त्या करिता चालु वर्षात पंतप्रधान मोदी आवास योजनेची तालुक्यातील उद्दिष्टे म्हणजे जेवढे घरकुल आलेली आहेत, त्यामध्ये वाढ करण्यात यावी अशी मागणी रोशनगावचे उपसरपंच प्रतिनिधी तथा सामाजिक कार्यकर्ते नागनाथ पाटील माळगे व पत्रकार दत्तात्रय सज्जन यांनी आज रोजी एका लेखी निवेदनाद्वारे केले आहेत



ग्रामीण भागातील नागरिकांना व गौरगरिबांना आपल्या हक्काचे पक्के घर असावे यासाठी शासनाने मोदी आवास घरकुल योजना ही राबवली जात आहे त्यासाठी शासनाकडून अनुदानही दिले जात आहे धर्माबाद तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना मोदी आवास योजना अंतर्गत तालुक्यांमध्ये उद्दिष्टे वाढवून वंचित लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात यावा गटविकास अधिकारी प्रफुल तोटेवाड यांच्याकडे नागनाथ माळगे व दत्तात्रेय शंकर सज्जन यांनी मागणी केली आहे.









# अंदमान च्या बेटा वरून

लेखक ✻ धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर



**अमरनाथ यात्री संघाचे अध्यक्ष धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या सिद्धहस्त लेखन शैलीतून रोमांचकारी असणारा अंदमान टूर चा रोज चा वृत्तांत याच ठिकाणी दररोज प्रसिद्ध करण्यात येत आहे. उद्याच्या अंकात सोबत असलेल्या प्रवाशांच्या प्रतिक्रिया प्रसिध्द करण्यात येणार आहेत.तसेच शेवटच्या भागात वाचकांच्या प्रतिक्रिया प्रसिध्द करण्यात येणार असल्यामुळे वाचकांना ही लेख माला कशी वाटली याबद्दल मोजक्या शब्दात प्रतिक्रिया ९४२१८ ३९३३३ या व्हाट्सअप क्रमांक वर पाठवाव्या ही विनंती. – संपादक**

(भाग ८)

लोकनेता न्यूज नेटवर्क

पिएरलेस हे रिसॉर्ट समुद्रकिनाऱ्यावर असल्यामुळे सकाळी सहा वाजता बीचवर फेरफटका मारला. सूर्योदय होत असल्याचे दृश्य पाहून मन प्रफुल्लित झाले. सकाळी मिळालेल्या या सुंदर वातावरणाचा आमचे टुरिस्ट आपल्या परीने फायदा घेत होते.उज्वला व रमेश केंद्रे या योग प्रेमी जोडप्यांच्या मार्गदर्शनाखाली लता व शामसुंदर कदम,यशोदा व उद्धव चौधरी,उमा व विजय कुलकर्णी,प्रा.अंजली व प्रकाश सिंगेवार,कल्पना व प्रा.राम जाधव,ड.विजया व तुकाराम इंद्राळे,सुरेखा व रमाकांत भुरे,प्रभा व नागोराव देव,रत्नमाला व रमेश बुलबुले हे योगा करत होते.स्मिता व शिवाजी देशपांडे,सुरेखा व सुभाष भिसे,अनिता व सुधीर देशपांडे,उषा व उत्तम पांचाळ,विद्या व व्यंकट नोमुलवार,सुषमा व रमेश जयकर,सायली व सुधीर देशपांडे, मैथिली व मुकुंद पांडे यांना प्रा. लक्ष्मी पुरणशेट्टीवार ह्या हास्य योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवित होत्या. आपल्या अनेक छायाचित्रांनी रसिकांची मने जिंकणारे प्रा.प्रकाश लालपोतू यांनी मंजुषा व राजू मोतेवार,वसुंधरा लालपोतू ,शारदा व अनिल कठाळे,शोभा व बालाजी कोटलवार,उषा व नारायणराव गेनवाड,आशा व प्रकाश चेके या जोडप्यांची सुंदर छायाचित्रे काढली.रोहन,स्वाती व ड.उमेश मेगदे,मंजू व डॉ.श्रीकांत चौधरी,सविता क्यातमवार,अश्विनी व ड.दामिनी डहाळे हे चिमुरडी मनुश्री चौधरीच्या बाललीला पाहण्यात दंग होते.

साडेसातच्या सुमारास अमेरिकन ब्रेकफास्ट घेऊन आम्ही स्वातंत्र्यवीर सावरकर विमानतळाकडे निघालो. सर्व सोपस्कार पूर्ण केल्यानंतर विमानाची वाट पाहत गेट नंबर पाच समोर बसलो होतो. विमान यायला एक तासाचा वेळ होता. सावरकरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचे अजरामर गीत जय स्तुते महा मंगले सर्वांनी सामूहिक गाण्याचा प्रस्ताव मी ठेवला.सगळ्यांचा होकार मिळाल्यानंतर गाण्याच्या ओळी डाऊनलोड करून ग्रुपमध्ये टाकले. त्यानंतर आम्ही सर्वजण हॉलमध्ये एका बाजूला उभे राहिलो.६१ जनांच्या मुखातून गायलेल्या या गीतामुळे विमानतळा वरचे वातावरणात बदलून गेले.इतर प्रवाशांना देखील हा नवीन प्रकार आवडल्यामुळे त्यांनीही गाताना साथ दिली. कित्येकांनी आपल्या मोबाईल मध्ये हा प्रसंग चित्रित केला. भारत माता की जय, वंदे मातरम, स्वातंत्र्यवीर सावरकरांचा विजय असो या घोषणांना उपस्थितांनी प्रतिसाद दिला. अचानक घेतलेला हा इव्हेंट टाळ्याच्या कडकडात संपला.

९.४० ला आमच्या विमानाने हैदराबाद कडे झेप घेतली. अडीच तासाच्या प्रवासात बहुतेक सर्वजण डुलक्या घेत होते. हैदराबाद येण्याच्या आधी मनात आला की, विमानात

जय स्तुते महा मंगले हे गीत सामूहिकरीत्या म्हणावे. लोक ऑब्जेक्शन घेतील, उगीच वाद नको असा सल्ला सहकाऱ्यांनी दिला. मी मनात विचार केला,सावरकरांच्या प्रेमापोटी आपण करीत असलेल्या या प्रकारामुळे कोणाची नाराजी झाली किंवा कोणी अपमान केला तरी सहन करायचे. म्हणतात ना गाजराची पुंगी वाजली तर वाजली. हिम्मत करून हवाई सुंदरी कडे विचारणा केली. आमचा हा महाराष्ट्राचा ग्रुप सावरकरांचे कट्टर प्रेमी असून आम्हाला त्यांचे गीत म्हणण्याची परवानगी द्यावी.एयर होस्टेस ने हा प्रकार कॅप्टनच्या कानावर टाकला. त्यांनी लगेच सहर्ष परवानगी दिली.विमानातील फोन सारख्या माईक मधून बोलण्याची

आयुष्यात पहिल्यांदाच संधी मिळाली होती.मी अनाउन्स केले की, हम महाराष्ट्र से आये वाले है. आपकी इजाजत हो तो स्वातंत्र्यवीर सावरकर इनका जय स्तुते महा मंगले यह गीत हम सब मिलकर गानेवाले है. आपभी साथ देना.कोणी काही म्हणण्याच्या आधीच मी आणि सुधीर देशपांडे यांनी जय स्तुते सुरू केले. आमच्या सोबत असलेल्या ग्रुप मधील इतर सर्वजण मोबाईल हातात घेऊन तयारच असल्यामुळे त्यांची योग्य साथ मिळाली. विमानातील इतर मराठी प्रवासी देखील आमच्या सोबत गीत म्हणू लागले. गीत संपल्यानंतर सर्वांनी घोषणा देऊन टाळ्यांचा कडकडाट केला.याचे शुटिंग एयर होस्टेस सह अनेकांनी केले.दुपारी साडेबाराच्या सुमारास हैदराबाद विमानतळावर उतरल्यानंतर पाच सहा जणांनी माझ्या सोबत सेल्फी काढून आमच्या सावरकर भक्तीचे कौतुक केले.

राजीव गांधी विमानतळावरून दोन एसी लक्झरी बस मध्ये बसून आम्ही निघालो. संदीप मैंद यांनी बिकानेर वाला या हैदराबादच्या प्रसिद्ध हॉटेलमध्ये सर्वांच्या भोजनाची व्यवस्था केली होती. रुचकर शाकाहारी भोजनाचा आस्वाद घेतला. तुकाराम इंद्राळे यांच्या आग्रहाखातर हॉटेलमधील एसी हॉलमध्ये निरोप समारंभ घेण्यात आला. प्रा.राम जाधव, श्यामसुंदर शिंदे,प्रा. लक्ष्मी पुदरोड, विजया कुलकर्णी यांनी सगळ्यांच्या वतीने आपल्या भावना व्यक्त केल्या.उषा गेनवाड ह्या शिघ्र कवयित्रीने माझ्यावर व संदीपजी वर तयार केलेली गीते सर्वांना आवडली.तुकाराम इंद्राळे यांनी केलेल्या कवितेला सर्वांनी दाद दिली. वेळेअभावी इतरांना मनोगत व्यक्त करता आले नाही. पण सर्वांचा सूर एकच होता आणि तो म्हणजे आयुष्यातील अविस्मरणीय झाली होती त्यांची अंदमान टूर.जयवंत वाणी या टूर मॅनेजरने चांगली सेवा दिल्याबद्दल सर्वांनी त्याला टीप दिली.

सर्वांच्या आग्रहा वरून संदीप मैंद यांनी आगामी फॅमिली ग्रुप टूर्स ची माहिती पुढीलप्रमाणे दिली.१० नोव्हे २०२४ रोजी ०९ दिवसाची गुजरात स्पेशल, २५ नोव्हे २०२४ रोजी ०९ दिवसाची दक्षिण भारत प्रति व्यक्ती २९५००/– ,कोस्टल कर्नाटक १३ डिसें २०२४ पासून ८ दिवस प्रति व्यक्ती २४५००/– ,गंगासागर जगन्नाथ पुरी ०१ जाने २०२५ पासून ८ दिवस प्रति व्यक्ती २७९००, १७ जानेवारी ला ७ दिवसाच्या अंदमान टूर साठी साठ हजार रूपये खर्च आकारण्यात येणार आहे.२३ जानेवारी २०२५ मध्ये सुरू होणारा राजस्थानचा टुर ९ दिवसाचा आहे.२९५०० शुल्क असलेला उत्तर प्रदेश चा ९ दिवसाचा टुर फेब्रु २०२५ मध्ये निघणार आहे.मार्च २०२५ मध्ये १२ दिवसाच्या नेपाळ साठी टुर कास्ट ३३९०० आहे.१० दिवसाची हिमाचल प्रदेश टूर एप्रिल २०२५ मध्ये पाहण्यासाठी ३०५०० शुल्क आकारले जाते.११ जुलै २०२५ रोजी २६ वी अमरनाथ यात्रा जाणार असून अकरा दिवसा साठी ३४९०० लागणार आहेत.

अंदमान सहलीचा आजचा शेवटचा दिवस असल्यामुळे सर्वांना परतीचे वेध लागले होते.काचिगुडा स्टेशन वरून ६.४० वाजता अजिंठा एक्स्प्रेस ने आम्ही निघालो. किरण मोरे यांने बाहेरून आणलेले जेवण सर्वांना वाटप केले. रात्री साडेबारा वाजता नांदेड स्टेशन वर सात दिवसांत एकमेकांमध्ये आलेला घनिष्ठपणा आयुष्यभर जपण्याचा निर्धार व्यक्त करून सर्वांनी एक दुस–यांचा निरोप घेतला.उद्याच्या भागात सहप्रवाशांच्या प्रतिक्रिया तसेच शेवटच्या भागात वाचकांच्या प्रतिक्रिया प्रसिध्द करण्यात येणार आहे. या लेखमालेला वाचकांनी दिलेल्या भरपूर प्रतिसादाबद्दल ऋण व्यक्त करून तुर्तास सर्वांची रजा घेतो.

**चराग़ों को आंखों में महफ़ूज़ रखना,**
**बड़ी दूर तक रात ही रात होगी !**
**मुसाफ़िर हैं हम भी मुसाफ़िर हो तुम भी**
**किसी मोड़ पर फिर मुलाक़ात होगी!!**
**(क्रमशः)**

# आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत नेहरू शाळेचा हमजा शेख प्रथम वसुंधराची ऋतुजा लटपटे द्वितीय तर गणेशचा आदित्य वांढरे तृतीय



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

मराठा सेवा संघाच्या वतीने महात्मा गांधी विद्यालय आष्टी येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी आंतरशाले वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण पंधरा शाळा मधील ३० स्पर्धकांनी भाग घेतला होता.

या स्पर्धेत पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाचा हमजा नदीम शेख याने महामानव छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर अप्रतिम असे भाषण केले. व २००१ चे प्रथम पारितोषिक पटकावले.वसुंधरा माध्यमिक शाळेची ऋतुजा पांडुरंग लटपटे हिने शेतकऱ्यांचे जीवन हुबेहूब श्रोत्यासमोर उभे केले.आणि १५०१ चे द्वितीय द्वितीय पारितोषिक प्राप्त केले.गणेश विद्यालयाचा आदित्य अण्णासाहेब वांढरे यानेही शेतकऱ्याचे जीवन चरित्र रेखाटून १००१चे तृतीय पारितोषिक मिळवले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडवा येथील प्रतीक्षा शरद पवार आणि वसुंधरा शाळेची अंकिता काकासाहेब पोकळे यांनी प्रत्येकी रुपये ५०१ चे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले.शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून मराठा सेवा संघाच्या वतीने या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस मराठा सेवा संघाचे लक्ष्मण रेडेकर व महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक जावेद पठाण सर यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून स्पर्धेचे उद्घाटन झाले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून मुकुंद लगड सर,बाळासाहेब तळेकर सर,सारुक सर,राजेंद्र लाड सर, वाल्हेकर सर यांनी काम पाहिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री लक्ष्मण रेडेकर सर हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. तानाजी जंजिरे हे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक ड सिताराम पोकळे जेष्ठ पत्रकार यांनी केले.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संतोष सायकड सर,हनुमंत बन्सी पोकळे सर,वाहेद सर व शाळेचा शिक्षक वृंद आणि मराठा सेवा संघाचे कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.शेवटी ड.सीताराम पोकळे,संयोजक यांनी संस्थाप्रमुख नियमतुल्ला बेग यांच्यासह सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# प्रा.हाके यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ उद्या कंधार येथे भव्य मोर्चा

## ओबीसी बहुजन समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे–चंद्रसेन पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

ओबीसी संघर्ष योध्दा प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावर पुणे येथे जीवघेणा भ्याड हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्याच्या निषेधार्थ उद्या शुक्रवारी, दि ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चामध्ये ओबीसी, बहुजन समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील सुरनर यांनी केले आहे.



३० सप्टेंबर रोजी पुणे येथे ओबीसी आरक्षण विषयाचे अभ्यासक प्रा.लक्ष्मण हाके यांच्यावर काही समाजकंटकांनी जीवघेणा हल्ला केला. शिवाय त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न केला. याचे पडसाद आता राज्यभर उमटत आहेत. ओबीसी समाज या घटनेनंतर एकवटला असून सर्वत्र निषेध नोंदवला जात आहे. या घटनेच्या निषेधार्थ उद्या शुक्रवारी ४ ऑक्टोबर सकाळी ११ वाजता कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. सदर मोर्चाला माईचे मंदिर, कंधार येथून भव्य मोर्चाला सुरुवात होणार असून, गांधी चौक, सराफा बाजार, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.

या मोर्चामध्ये सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते, ओबीसी, बहुजन समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत, अशी माहिती आयोजक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील सुरनर यांनी कंधार येथे आयोजीत पत्रकार परिषदेत माहिती दिली.

यावेळी लोहा कृउबा समितीचे संचालक केरबा केंद्रे, लोहा न.प.चे माजी नगरसेवक रमेश माळी, डॉ.विश्वनाथ राठोड,आंबुलग्याचे सरपंच माधव मुसळे,माळाकोळी उपसरपंच अरुण सोनटक्के, धावरीचे सरपंच अशोक गित्ते, मंगरुळचे सरपंच अमोल हाके, बबन जोंधळे,प्रेमानंद गायकवाड,विहान कदम,बंडू रमण आदी उपस्थित होते,

**कासारवाडी येथे बाईपण भारी देवा जिवंत देखाव्याचा प्रथम क्रमांक (हा देखावा अकरा दिवस उरुळी कांचन येथे चालू होता ) जय हो एंटरटेनमेंट निर्माता, दिग्दर्शक, लेखक –प्रकाशजी वाघमारे यांजकडून सर्जेराव विलास उदागे यांना प्रमुख उपस्थिती समीर कदम (सैराट फेम) मेकअप आर्टिस्ट यांच्या हस्ते उत्कृष्ट कलाकार म्हणून पुरस्कार मिळाला (स्वराज,आरती खिलारे, निखिल शहा, गणेश पाटील, शशिकला सवणे,बिराजी घोगरे,संजू भंडारी,छाया झेंडे,गायत्री पवळे, तनिषा हेगडे,ज्योती यादव,संगीता यादव, यांना देखील उत्कृष्ट कलाकार म्हणून पुरस्कार मिळाला ) कार्यक्रमाचे सूत्रसंचालन –सर्जेराव उदागे यांनी केले.**



# डॉ.अशोक थोरात यांची आचारसंहितेपूर्वी बीड जिल्हा बाहेर बदलीसाठी मुख्य निवडणूक आयुक्तांना तक्रार–डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांनी शासकीय सेवेत असताना केज तालुक्यातील तांबवा जिल्हा परिषद गटातुन जिल्हा परिषदेची निवडणूक लढवणे तसेच जिल्हा शल्य चिकित्सक पदावर असताना राजकीय सहभाग असल्याची लेखी तक्रार तत्कालीन विरोधी पक्षनेते आणि विद्यमान कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री बीड यांनी लेखी तक्रार मुख्य निवडणूक आयुक्त, निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य मुंबई यांना केली होती. त्यांचा पुर्व इतिहास पाहता त्यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तसेच आदर्श आचारसंहिता भंग करणारी असल्याने आगामी आचारसंहितेपुर्वी त्यांची तात्काळ बीड जिल्हा बाहेर बदली करून त्यांच्या विरूद्ध नियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड, निवडणूक निर्णय अधिकारी बीड, तहसीलदार बीड यांच्या मार्फत मुख्य निवडणूक आयुक्त, निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य मुंबई आणि कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांना केली असुन ठोस कारवाई न झाल्यास औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करणार असल्याचे म्हटले आहे.

बीड जिल्हा शल्यचिकित्सक पदी नियुक्ती झालेले डॉ.अशोक थोरात हे मागील २०१७ ते २०२० दरम्यान बीड येथे जिल्हा शल्यचिकित्सक पदांवर काम करत असताना तत्कालीन विरोधी पक्षनेते विधान परीषद व विद्यमान कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड ना.धनंजयजी मुंडे आणियांनी दि.२७ फेब्रुवारी २०१९ रोजी मुख्य निवडणूक आयुक्त , राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य मुंबई यांना लेखी तक्रार केली होती की डॉ.अशोक थोरात हे बीड जिल्ह्यात मागील २० वर्षांपासून कार्यरत असुन त्यांनी अनेकवेळा शासकीय सेवेत असताना राजकारणात प्रत्यक्ष सहभाग



घेतला आहे. बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील तांबवा जिल्हा परिषद गटातुन जिल्हा परिषदेची निवडणूक सुद्धा शासकीय सेवेत असताना लढवलेली आहे.जिल्हा शल्यचिकित्सक या महत्वाच्या पदावर असताना डॉ.अशोक थोरात यांचा राजकीय सहभाग स्पष्ट दिसुन येतो.आगामी सार्वत्रिक निवडणूका लक्षात घेता डॉ.अशोक थोरात यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तसेच आदर्श आचारसंहिता भंग करणारी असल्याने आचारसंहितेपुर्वी त्यांची तात्काळ बीड जिल्हा बाहेर बदली करून त्यांच्याविरुद्ध नियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी.

तसेच डॉ.अशोक थोरात यांच्यावर अवैध गर्भपात प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल असुन त्याप्रकरणी त्यांना निलंबित करण्यात आले होते व मा.उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयाने डॉ.अशोक थोरात यांच्या विरूद्धचे दाखल झालेले गुन्हे कायम केलेले आहेत व सदर प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.राजकीय वरद हस्ताने ते अद्याप बीड जिल्ह्यात कार्यरत असुन सध्या ते सत्ताधारी पक्षाचा शासकीय सेवेत असताना प्रचार करत आहेत.सदर प्रकरणाचे संपूर्ण पुरावे सोबत जोडण्यात आलेले आहेत असे म्हटले आहे.माजलगाव विधानसभा मतदार संघात निवडणूक लढवण्यासाठी डॉ.अशोक थोरात यांनी ३ महिन्यांपुर्वी दि.०५.०६.२०२४ रोजी महिन्यांपुर्वी स्वेच्छानिवृत्ती साठी अर्ज ( O.A.No.884/2024) दिला होता.मात्र कोविड मधील गैरव्यवहार प्रकरणी त्यांची चौकशी सुरू असल्याने त्यांचा अर्ज दि.१९.०६.२०२४ रोजी फेटाळण्यात आला आहे.कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री बीड यांनी विरोधी पक्षनेते असताना डॉ.अशोक थोरात यांचा शासकीय सेवेत बीड जिल्हाशल्य चिकित्सक सारख्या महत्वाच्या पदावर असताना राजकीय सहभाग असल्याचा पुराव्यानिशी लेखी तक्रार करत डॉ.अशोक थोरात यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तसेच आदर्श आचारसंहिता भंग करणारी असल्याने आचारसंहितेपुर्वी त्यांची तात्काळ बीड जिल्हा बाहेर बदली करण्यात यावी असे म्हटले होते. आता पालकमंत्री बीड धनंजय मुंडे सत्तेत असताना बीड जिल्हा शल्य चिकित्सक पदी डॉ.अशोक थोरात यांची नियुक्ती नेमकी कोणती तडजोड करून करण्यात आली असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

# ऑक्टोबर व नोव्हेंबरचे लाडकी बहिण योजनेचे पैसे १० ऑक्टोबर पर्यंत देणार

## समाजातील सर्व समाज घटकांच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक, समतोल विकासासाठी हे सरकार वचनबद्ध-अजित पवार

### मला जाणीवपूर्वक टार्गेट केलं जातं आहे, मला टार्गेट करणाऱ्यांना इथली जनता उत्तर देईल–धनंजय मुंडे






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

समाजातील सर्व समाज घटकांचा सर्वांगीण, सर्वसमावेशक, समतोल विकास करण्यासाठी महायुतीचे हे सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी परळी येथे दिली. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ऑक्टोबर व नोव्हेंबर चे पैसे बहिणींच्या खात्यात १० ऑक्टोबर पर्यंत देणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणाही त्यांनी परळी येथील जन सन्मान यात्रेत केली. तर धनंजय मुंडे यांच्यावर २०२४ नंतर मोठी जबाबदारी असणार आहे असे संकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी यावेळी बोलताना दिले अजित दादांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कोणतीच कमतरता नसल्याने बीड जिल्ह्याचा सर्वंकष विकास निश्चित करू अशी ग्वाही पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

**मला जाणीवपूर्वक टार्गेट केलं जातं आहे, मला टार्गेट करणाऱ्यांना इथली जनता उत्तर देईल – धनंजय मुंडे**

**विकासाच्या मुद्द्यावर आपण दादांच्या निर्णयाला साथ दिली, दादांच्या बोटाला धरून मी पक्षात आलो. जिथे एक पंचायत समिती सदस्य नव्हता त्या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ९०% यश मिळवून दिले. मात्र दादांच्या नेतृत्वात आम्ही न्यायाची साथ स्वीकारल्यापासून मला जाणीवपूर्वक टार्गेट केलं जातं आहे. मात्र मला टार्गेट करणाऱ्यांना माझ्या परळीची जनता मतपेटीतून उत्तर देईल, असे मत मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.**

**धनंजय मुंडेंना २०२४ नंतर मोठी जबाबदारी –सुनील तटकरे**


**धनंजय मुंडेंना २०२४ नंतर मोठी जबाबदारी देवू असे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष जयंत तटकरे यांनी केले.धनंजय मुंडे तुम्ही परळी पुरते नेते नाहीत तर संपूर्ण महाराष्ट्राचे नेते आहात, गोपीनाथ मुंडे नंतर विरोधी पक्षनेता कसा असावा हे धनंजय मुंडे यांनी महाराष्ट्राला दाखवले .आगामी विधानसभा निवडणुकीत फॉर्म भरायला धनंजय मुंडे येतील बाकी पूर्ण वेळ राज्यभरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचाराची जिम्मेदारी त्यांच्यावर असेल. आयोजन नियोजन आणि जन संघटन याचे मोठ्या कौशल्य मुंडे यांच्याकडे आहे ते एक प्रकारे शो मॅन असल्याचे गौरवोद्गार तटकरे यांनी यावेळी काढले.**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या जनसन्मान यात्रेचे आयोजन परळी शहरात करण्यात आले होते.लाडक्या बहिणींच्या सशक्तिकरणाच्या दृष्टीने तसेच परळी मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींशी व नागरिकांशी ना.अजितदादा पवार यांसह प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी संवाद साधला. शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील मैदानात अभूतपूर्व सभा झाली.तत्पूर्वी भव्य स्वागत मिरवून काढण्यात आली होती. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी सांगितले की, आम्ही लोकांना वाऱ्यावर सोडत नाही.आपल्याला विकास साधायचा असेल तर बीड–परभणीमध्ये विमानतळ होणं अत्यावश्यक आहे.. तरच एमआयडीसी, कारखानदारी येईल.रोजगार निर्मिती होईल.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सर्वांना न्याय देण्याची भूमिका घेणारा पक्ष आहे.ऑक्टोबर व नोहेबरचे लाडकी बहिण योजनेचे पैसे आम्ही १० ऑक्टोबर पर्यंत देणार आहोत. है पैसे स्वतः साठी वापरा, महिलांनी सन्मानांनी राहावे यासाठीच ही योजना आणली असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.बीड जिल्ह्यातील जनता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांवर प्रेम करते. माझे बीड जिल्ह्यावर प्रेम, परळीकरांवर विशेष प्रेम आहे. तालुक्यातील वडखेल येथे लवकरच सिताफळ इस्टेट उभी करणार आहोत, जिरेवाडी येथे शासकीय कृषी महाविद्यालय, कृषी व्यवस्थापन महाविद्यालयाला मंजुरी दिली आहे. शासनाच्या योजना तुमच्या पर्यंत पोहचवण्यासाठी जन सन्मान यात्रेचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या योजनांच्या माध्यमातूनमहिलांना सक्षम, आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न आहे. १० व्या अर्थसंकल्पात महिलांना समोर ठेवून योजना ठरवण्यात आल्या. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेवर ४६ हजार कोटी रुपये खर्च करत आहोत. केंद्रातील सरकार आपल्या विचारांचे असल्याने आम्ही म्हटल्या बरोबर कांदा निर्यातीवरील बंदी उठवली आहे. हे सरकार सर्वांगीण व समतोल विकास साधणारे सरकार असून विरोधकांच्या भुलतापाला बळी न पडता व सर्व लाभार्थ्यांना दिलेले सर्व लाभ कायमस्वरूपी ठेवण्यासाठी महायुती सरकारच्या पाठीशी खंबीरपणाने उभे रहा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्राच्या विविध योजना व महत्त्वकांक्षी प्रकल्प पूर्ण होत आहेत. महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे त्याच अनुषंगाने दादांच्या आशीर्वादाने व नेतृत्वाखाली काम करताना बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कुठेही निधीची आपल्याला कमतरता नाही. बीड जिल्ह्यासाठी दादांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर विकासाची कामे व अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प मंजूर झालेले आहेत. दादांचा वादा हा पक्का आहे त्यामुळे दादांना येणाऱ्या काळात पाठबळ देण्याचा वादाही आपल्याला निश्चित करावा लागेल, त्या दृष्टीने सर्वांनी आपले आशीर्वाद दादांच्या मागे उभे करावेत असे आवाहन यावेळी ना धनंजय मुंडे यांनी केले. दरम्यान लाडक्या बहिण योजनेचा लाभ घेऊन त्या रक्कमेतून स्वतःचा सजावट वस्तू तयार करण्याचा व्यवसाय सुरू केलेल्या परळीतील अक्षराताई शिंदे या तरुणीचा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी अक्षराताईने स्वतःच्या हाताने बनवलेल्या सजावटीच्या वटवृक्षाची भेट अजितदादाना दिली, मात्र दादांनी ताई, तू हे विकायला तयार केलेस ना? मग किती रुपयांना विकतेस? असा प्रश्न अक्षराला करताच, अक्षराने दीडशे रुपये सांगितले. त्याबरोबर दादांनी आपल्या कर्मचाऱ्याला जवळ बोलावून, ताईला दिडशे रुपये दे रे... असा आदेशच दिला!दरम्यान परळी शहरात आगमन होताच अजितदादा पवार व मान्यवरांची भव्य रॅलीद्वारे मिरवणूक काढण्यात आली, यावेळी शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक, रेल्वे ओव्हर, ब्रिज एक मिनार चौक, यांसह ठिकाणी स्वागत करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार धनंजय मुंडे यांचा इतर मान्यवरांनी यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यारलीमुळे जनसमान यात्रेचे एक गुलाबी रंगाचे वादळ परळी मध्ये निर्माण झाले होते. या मेळाव्यास उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, आ.विक्रम काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ऍड.राजेश्वर चव्हाण, कल्याणराव आखाडे, अजय मुंडे, वाल्मिक अण्णा कराड, राजकिशोर मोदी, युवतीच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे, दत्ता पाटील, गोविंदराव देशमुख, फारूक पटेल, बाजीराव धर्माधिकारी, राजाभाऊ औताडे, वैजनाथराव सोळंके, युवकांचे जिल्हाध्यक्ष सुशांत पवार, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष प्रज्ञाताई खोसरे, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष अजिंक्य अनेराव, युवतीच्या प्रिया डोईफोडे, यांसह पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

## लोणार सरोवरातील जागृत देवस्थान 'माँ कमळजा देवी'

■लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार सरोवर । विनायक कुटे




माँ कमळजा माता मंदीर हे निसर्गरम्य लोणार सरोवर क्षेत्रात वसलेले पवीत्र धार्मिक स्थळ आहे. नवरात्र उत्सवा निमीत्य नऊ दिवस भावीक भक्ताची दर्शनासाठी या ठिकाणी गर्दी असते.विशेष म्हणजे यावर्षी पाण्याची पातळी वाढल्याने भाविकानी काळजी घेण्याची आवश्कता आहे.

माँ कमळजा देवीचे मंदीर तलावाच्या काठावर असुन त्याला तीन मुख आहे. उत्तरेकडील महाद्वारातुन गंगाभोवतीचे पडणारे पाणी दिसते. देवीचा मुखवटा तांदळा सारखा आहे. तीचा आकार माहुरच्या देवीसारखा आहे. पुराणामध्ये यास पद्मावती देवी संबोधले जाते. मंदीर हे कदंब काळातील आहे. साधे चुना मातीच, भव्य उंच दिपमाळ आहे. मंदिरा समोरच सौभाग्य तिर्थ व सासु–सुनेची विहीर आहे. पाण्याची पातळी वाढल्याने आता ही विहीर दिसून येत नाही या विहीरीच वैशिष्ट्य म्हणजे अर्धे पाणी गोड व अर्धे खारट आहे.सिता वनवासात असताना ओटी भरल्याचे वाल्मीकी रामायणात आहे. अगस्ती ऋषीची पत्नी लोपमुद्रा येथे मंदीरात सीतेला भेटली. विष्णू ने जेव्हा लवणासुराचा वध केला होता. तेव्हा देवी त्यांच्या सोबत आल्या होत्या. विनंती वरुन येथेच राहील्या असा पुराणात उल्लेख आहे. साक्षात लोणार सरोवरातील माँ कमळजा देवी हे जागृत ठिकाणी असून नवसाला पावणारी देवी असल्याने आजही भाविक–भक्त मोठ्या श्रध्देने नवस फेडताना दिसून येतात. आजही मॉ कमळजा माता कित्येक कुंटुबाची कुलदेवता आहे. नवरात्र उत्सवात दररोज महाराष्ट्रासह देशभरातून दररोज शेकडो भावीक भक्त दर्शनासाठी येत असतात.वन्यजीव विभागाच्या वतीने सरोवरात जाणाऱ्या भाविकाना मार्गदर्शन केले जाते. बॉक्स –सरोवरात माँ कमळजा मातेच्या दर्शनास जाण्यासाठी मंठा रस्त्यावरील एमटीडीसी समोरून रस्ता आहे.वन्यजीव विभागाचे अधिकारी –कर्मचारी येथे तैनात असणार आहे.

## इंदापूर महाविद्यालयच्या विद्यार्थ्यांनी उपजिल्हा रुग्णालयातील परिसर केला स्वच्छ

### २१५ विद्यार्थ्यांनी रुग्णालयाच्या परिसरात केले परिश्रम





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे

इंदापूर महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष व माजी मंत्री तसेच राष्ट्रीय सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात.दिनांक ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना व एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत इंदापूर मधील उपजिल्हा रुग्णालय परिसरातील स्वच्छतेची मोहीम हाती घेतली . यावेळी उपस्थित उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.सिद्धार्थ नामपल्ली डॉ.सोमनाथ खाडे,परकाळे सर,सोलापूर सर,घुले सिस्टर,नवगिरे सिस्टर,कोकरे व इतर कर्मचारी उपस्थित होते. डॉ.खाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते म्हणाले की महाविद्यालयीन युवक हे समाजाचे प्रतिनिधित्व करत असतात.त्यांनी जर स्वच्छतेचे महत्व लोकांना पटवून सांगितले असता सामाजिक विकासासाठी मदतच होते.समाजातील प्रत्येक व्यक्तीने आरोग्याची काळजी घेत असताना स्वच्छतेला प्राधान्य दिले पाहिजे.महाविद्यालयीन जिवनातील संस्कार हे विद्यार्थ्याच्या आयुष्याला दिशा दर्शक ठरतात. या उपक्रमात महाविद्यालयातील २१५ विद्यार्थ्यांनी रुग्णालय परिसरात असणारे गवत,प्लास्टिकच्या बॉटल,इतर कचरा स्वच्छ करण्याचे काम केले.या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जीवन सरवदे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देवुन उपक्रमा साठी शुभेच्छा दिल्या.या उपक्रमात एन.एस.एस.विभाग प्रमुख प्रा.उत्तम माने,डॉ भिमाजी भोर,प्राध्यापिका गायकवाड मॅडम,प्रा.साठे,एन.सी.सी विभागाचे प्रमुख डॉ.सुरेंद्र शिरसट व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.तानाजी कसबे,व तिन्ही विभागातील विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## शबाना पिंजारी यांची जिल्हाधिकारी पदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा । प्रतिनिधी



नांदेड जिल्ह्यातील पिंजारी समाजाची कन्या शबाना पिंजारी यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत जिल्हाधिकारी होण्याचा बहुमान मिळवला आहे. पिंजारी समाजातील पहिली महिला जिल्हाधिकारी म्हणून त्यांची निवड झाली आहे. पिंजारी समाज हा अत्यंत भटका समाज आहे, पिंजारी समाजाचा गाद्या बनवणे हा मुख्य व्यवसाय असून अशा गरीब समाजातील या मुलीने हे यश संपादन केले आहे. त्या बद्दल ऑल इंडिया मंसुरी फेडरेशनचे मराठवाडा अध्यक्ष शेख सादिक भाई मन्सुरी यांनी शबाना पिंजारी यांचे अभिनंदन केले असून पुढील कार्यासाठी आणि वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## कामाई देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने महात्मा गांधी यांची जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नायगाव । प्रतिनिधी

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त कामाई देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले, दरवर्षीच या संस्थेच्या वतीने महापुरुषांची जयंती पुण्यतिथी साजरी करून त्यांना अभिवादन करण्यात येते,यावेळी संस्थेच्या अध्यक्षा तथा काँग्रेस विज्ञान तंत्रज्ञान व कौशल्य विभाग महाराष्ट्र संघटक रेखाताई बनसोडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी विज्ञान-तंत्रज्ञान व कौशल्य विभागीय मराठवाडा सरचिटणीस राजेंद्र मारोती रेड्डी, शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्या लक्ष्मीबाई मदने माधव विठ्ठलराव डोरणेवाड,कविता माधव डोरणेवाड गंगाबाई व्यंकट रेड्डी, बाबू व्यंकट रेड्डी, गोदावरी गायकवाड यासह अधिजनाची उपस्थिती होती.



# खालच्या पातळीवर जाऊन राजकारण करू नये - बालाजी पाटील खतगांवकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुखेड । शिवकुमार बिरादार

दिनांक १ ऑक्टोबर रोजी शिवसेना जनसंपर्क कार्यालय मुखेडपासून सुरू झालेल्या 'परिवर्तन महारॅली'चा समारोप मण्णेर येथे झाला. जेसीबीच्या साहाय्याने फुलांची उधळण करीत ठिकठिकाणी बालाजी पाटील खतगांवकर यांच्या रॅलीचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राची लोककलेने आणि महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

या तालुक्यात रस्त्याचे, बेरोजगारांची, सरकारच्या योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी बालाजी पाटील खतगांवकर यांना निवडून द्यायचं आहे. खतगावकर प्रत्येकाची व्यथा जाणून घेत असून ते २ वर्षांपासून विकासाचा आराखडा तयार करत आहेत. विकास करायचा असेल तर बालाजी पाटील खतगांवकर यांना निवडून द्या. ही लढाई कोणत्या पक्षाची नसून सर्वसामान्य माणसांची आहे. ते जनतेचे, शेतकरी, बेरोजगारांचे आणि महिलांचे प्रश्न सोडवण्याचे उमेदवार आहेत. आतापर्यंत निवडून आलेल्यांनी आतापर्यंत काय केले? मतदारसंघातील गरीब माणसांपर्यंत बालाजी पाटील खतगांवकर पोहोचणार आहेत, असे प्रतिपादन श्री. सुभाषराव काटे यांनी केले. मुखेडमध्ये धनशक्तीच्या विरूद्ध जनशक्ती तयार झाली आहे. परिवर्तन हे मतदानाच्या रूपाने झाले पाहिजे. पैशाच्या जोरावर लोकप्रतिनिधी सत्ता भोगत आहेत. सत्तेची भूक असलेल्या माणसाची नशा बालाजी पाटील खतगांवकर उतरवू शकतात. हाटकर समाजानंतर लिंगायत समाजाचे मतदान आता बालाजी पाटील खतगांवकर यांच्या पाठीशी आहे, असे श्रावण नरभागे यांनी स्पष्ट केले.

ही इतिहास घडवणारी रॅली आहे. मतपेटीतून राजा निर्माण होतो. आम्ही पळणारे नाही. बालाजी पाटील खतगांवकर यांच्यासारखा हिरा तालुक्याला लाभला आहे. येणाऱ्या काळात त्यांच्याकडून विकास होऊ शकतो. त्यांना आपल्याला आमदार करायचे आहे. येथे सर्वसामान्यांची बिकट परिस्थिती झाली आहे. हजारो लोकांचे काम त्यांनी केलीत. सगळ्या क्षेत्रात मुखेड तालुक्याचे नाव येणाऱ्या काळात पुढे येईल. स्वातंत्र्य मिळूनही तालुक्याचा विकास झाला नाही. अनेकांना निवडून दिले तरी हा भाग विकासापासून



वंचित राहिला आहे. तुमच्यावर कोणतेही संकट येऊ द्या, तुमची आर्थिक परिस्थिती नसेल तर बालाजी पाटील खतगांवकर त्यासाठी खंबीर असतील. जर ते निवडून आले तर त्यांच्याकडून लेंडी धरणग्रस्तांसाठी ११ लाख रुपये घेतल्याशिवाय शांत बसणार नाही, असे आश्वासन श्री. व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी दिले. तालुक्याची परिस्थिती भयानक झाली आहे. येथे अजून रस्ते नाहीत. दवाखाना नाही, स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण पण येथे एमआयडीसी नाही. अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळयासाठी मुखेड तहसील कार्यालयाजवळ जागा निश्चित करण्यात आली आहे. मण्णेरचा सर्वांगीण विकास केल्याशिवाय शांत राहणार नाही. येथील सर्व समस्या दूर करून देवस्थानाला पर्यटन स्थळाचा दर्जा दिला जाईल. कोणीही खालच्या पातळीवर जाऊन राजकारण करू नये, असे यावेळी खतगांवकर यांनी स्पष्ट केले. तसेच मण्णेर देवाच्या आशीर्वादाने मुखेड आणि कंधार विधानसभा क्षेत्रातील सर्व समाज बांधवांच्या विकासाची शपथ घेतली.

यावेळी श्री. व्यंकटराव पाटील गोजेगावकर (माजी शिक्षण सभापती जिल्हा परिषद, नांदेड), श्री. अशोक पाटील रावीकर (माजी सभापती), श्री. बालाजी पाटील खतगांवकर (खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य), श्री. शंकर पाटील लुटे (शिवसेना ज्येष्ठ नेते), डॉ. रामराव श्रीरामे, श्री. माधव पाटील बामणीकर (मण्णेर देवस्थान प्रमुख), श्री. सुभाषराव काटे (शिवसेना माजी जिल्हा प्रमुख, लातूर), श्री. सौ. मीराताई मुंडे (शिवसेना तालुकाप्रमुख), श्री. गुणवंतराव पाटील हंगरगेकर (शेतकरी नेते), श्री. शिवराज पाटील मसलगेकर (शेतकरी नेते), श्री. काशी पाटील हाक्के, श्री. श्रीकांत काळे (सरपंच बेन्नाळ) यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ देखील उपस्थित होते.

## महाराजा कॉलेज कुस्ती खेळाडू पै.समीक्षा टोणगे व पै.कामिनी देविकर यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले

भाळवणी तालुका पारनेर येथे दिनांक ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या शालेय विभागस्तरीय स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील १९ वर्ष मुली व मुले सर्वच खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश मिळवले त्यामध्ये पैलवान समीक्षा टोणगे व पैलवान कामिनी देविकर यांची शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

यामध्ये समीक्षा टोणगे ६५ ज्ञस प्रथम क्रमांक, कामिनी देविकर ७२ ज्ञस प्रथम क्रमांक, श्रुतिका पवार ७६ ज्ञस तृतीय क्रमांक, अशोक पालवे ७९ ज्ञस व्दितीय क्रमांक



मिळविला खेळाडूंना क्रीडा शिक्षक संजय डफळ, संतोष जाधव क्रीडा संचलिका कल्पना बागुल, पालक व कोचेस यांचे मार्गदर्शन लाभले.

विजयी खेळाडूंचे महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन आमदार बबनराव पाचपुते, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी आ. राहुल जगताप, महावीर पाठवा, कॉलेजचे प्राचार्य महादेव जरे, उपप्राचार्य शहाजी मखरे, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, डॉ प्रकाश साळवे, प्रा.सुदाम भुजबळ, जिमखाना प्रमुख संजय अहिवळे, सर्व विभाग प्रमुख, सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी, खेळाडू यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## राधेश्याम चांडक यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालयात व अनाथ मुलांच्या वसतिगृहात फळे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे

लो ह्यात सामाजिक बांधिलकीची जोपासत दरवर्षीप्रमाणे यंदाही बुलढाणा अर्बन बॅकेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला आहे.

लो ह्यात बुलढाणा अर्बन बॅकेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांच्या वाढदिवसानिमित्त लोहा येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात बुलढाणा अर्बन बॅकेचे नांदेड जिल्हा विभागीय व्यवस्थापक प्रफुल्ल संचेती यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा अर्बन बॅंक शाखा लोहा च्या वतीने शासकीय उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना व लोहा जि.प. अनाथ मुलांच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना



सफरचंद,केळी फळे वाटप करण्यात आले.

यावेळी बुलढाणा अर्बन बँक शाखा लोहा चे व्यवस्थापक केशव शेटे, शशिकांत शेटे विभागीय लेखा परीक्षक,इंदल पवार साहाय्यक शाखा व्यवस्थापक,अक्षय माळोदे सहाय्यक शाखा व्यवस्थापक,प्रविण कदम, मनोज बियाणी, जयश्री बुरशे-घंटे ,ऋषीकेश खरात, अंकुश गिते, गजानन पेजुले , सचिन महाजन अल्पबचत प्रतिनिधी, बालाजी इरमलवार अल्पबचत प्रतिनिधी, श्रीकांत पाटील ढगे, भागवत आंबेकर, जेष्ठ पत्रकार सुरेश जोंधळे, विलास सावळे, शिवराज पाटील पवार, विक्रम घंटे आदी उपस्थित होते.

## पर्यावरण प्रेमी व्याख्याते संतोष परदेशी यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार २०२४

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

मांडवगण फराटा ता.शिरूर जि.पुणे येथील निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्याचे राज्य कार्याध्यक्ष व्याख्याते संतोष शामराव परदेशी यांना विश्वशांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था भारत,इन्स्टिट्यूट मिनोझीस बांग्राझा पणजी,गोवा व संज्योती पब्लिकेशन यांच्या संयुक्त विद्यामाने रविवारी पणजी गोवा येथे गोव्याचे माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर , गोवा राज्याचे माजी मंत्री प्रकाशजी वेळीप,माजी उपसभापती शंभु भाऊ बांदेकर, आय.एम.बी.गोवाचे अध्यक्ष दशरथराव परब,सरकारी वकील एन.डी.पाटील.विश्र्वशांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजयभाऊ चौधरी आदी मान्यवराच्या उपस्थितीत संस्कृती भवन पणजी,गोवा येथे प्रदान करण्यात आला..परदेशी यांनी संस्काराचे जीवनातील महत्व,पर्यावरण या



**पणजी,गोवा चे माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर,माजी मंत्री प्रकाशजी वेळीप,माजी उपसभापती शंभु भाऊ बांदेकर,आय.एम.बी.अध्यक्ष दशरथराव परब,सरकारी वकील एन.डी.पाटील.विश्र्वशांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजयभाऊ चौधरी यांच्या हस्ते प्रदान..!**

विषयावर अनेक व्याख्याने दिली आहेत.तसेच पर्यावरण वाचवण्यासाठी वृक्षारोपण व वृक्ष संगोपणासाठी भरीव काम केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते कार्य करीत आहे.वृत्तपत्रातून वेगवेगळ्या विषयावर त्यांचे लेख प्रकाशित आहे.कोरोना काळातही विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी त्यांनी प्रयत्न केले आहे.यापूर्वी त्यांना २५ हूनअधिक शैक्षणिक व सामाजिक पुरस्कार मिळाले आहेत.यासर्व कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.या पुरस्काराबद्दल शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनिल बोरा,शालेय समितीचे अध्यक्ष प्रकाश बाफना,शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव नंदकुमार निकम,वाघेश्वर विद्याधाम प्रशालेचे मुख्याध्यापक रामदास चव्हाण, उपमुख्याध्यापक गणपत बोत्रे, पर्यवेक्षिका संपदा वेताळ,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश ढमढेरे,उपाध्यक्ष बालाजी कांबळे,पालक संघाचे उपाध्यक्ष सचिन फराटे मांडवगण फराटा ग्रामस्थ यांनी त्याचे अभिनंदन केले.

### विधानसभेच्या पार्श्वभूमीवर वर्धापन दिनानिमित्त

## आर पी आय (आठवले) पक्षाची आढावा बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले

३ आक्टोंबर रोजी सातारा येथे होणाऱ्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचा ६७ व्या वर्धापनदिना निमित्त श्रीगोंदा तालुक्यातून कार्यकर्ते मोठ्या सकाळी संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष राजाभाऊ जगताप यांनी शासकीय विश्रामगृह श्रीगोंदे येथे आयोजित बैठकीत बोलताना दिली. यावेळी आर पी आय पक्षाचे जेष्ठ नेते जिवाजी घोडके, तालुका संघटक आनंद शिंदे, तालुका सचिव राजू काळेवाघ, तालुका सरचिटणीस भाऊसाहेब घोडके, युवक तालुकाध्यक्ष जॉन घोडके युवक, शहराध्यक्ष चेतन ससाणे यांच्या सह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी राजाभाऊ जगताप बोलताना म्हणाले लोकसभा निवडणुकीत शिर्डीच्या जागेवरून उद्भवलेल्या वादामुळे पूर्ण महाराष्ट्रातील आरपीआयचे कार्यकर्त आणि समाज बांधव महायुतीवर नाराज असल्याचे चित्र सर्वत्र दिसून आले याचाच फटका नगर उत्तर-दक्षिण सह पूर्ण राज्यामध्ये दिसला. आता नगर जिल्ह्यामध्ये श्रीरामपूर राखीव मतदार संघाची मागणी आम्ही केली आहे ती महायुतीतील



घटक पक्षांनी त्वरित मान्य करुन ती जागा आरपीआयला सोडावी. आम्ही महायुतीच्या मागे एवढ्या ताकतीनिशी उभे राहतो तरी आम्हाला प्रत्येक ठिकाणी डावलले जाते. आमचे कार्यकर्ते प्रसिद्धीला हापापले नसून प्रत्येक ठिकाणी त्यांचे ग्राउंड लेव्हलला वर्चस्वच आहे हे सर्व प्रशासनाला माहिती आहे. यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीबाबत चर्चा करण्यात आली.यावेळी स्वप्निल घोडके,ऋतिक जाधव, पप्पू जगताप, साजन घोडके, शेखर घोडके, किरण शिंदे, शशी घोडके, तुषार जगताप, बंडूभाऊ घोडके, राम घोडके, सचिन घोडके, दादा जगताप, योगेश घोडके, भैया कांबळे, शोएब शेख, अभिषेक तळेकर इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## ४ ऑक्टोबर रोजी राज्यातील हजारो दिव्यांग करणार मंत्री अब्दुल सत्तार यांच्या घरावर आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

बुधवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी मुंबई मंत्रालय वर आकाशवाणी आमदार निवास या ठिकाणी प्रहार प्रमुख बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील दिव्यांगांचे आंदोलन झाले होते.

सकाळी ११ वाजता सुरू झालेले हे आंदोलन रात्री साडेनऊ वाजेपर्यंत तब्बल पाच तास धो धो पावसामध्ये सुरू होते. या आंदोलनाची दखल घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्री अब्दुल सत्तार यांना पुढाकार घेऊन दिव्यांगांना संजय गांधी निराधार अनुदान वाढवून देण्याचे आदेश दिले होते. शासनाच्या वतीने मंत्री अब्दुल सत्तार यांनी आंदोलनाच्या ठिकाणी येऊन आमदार बच्चू कडू यांना व दिव्यांगांना भर पावसात जाहीर आश्वासन दिले होते की सोमवार दिनांक ३० सप्टेंबर रोजी होणाऱ्या कॅबिनेट मंत्रिमंडळ बैठकीत दिव्यांगांचे मासिक मानधन वाढविण्यात येईल.इतर मागण्या संदर्भात मंत्रालयात बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावले



जातील. याच वेळी बच्चुभाऊंनी मंत्री अब्दुल सत्तार यांना इशारा दिला होता की आम्हाला खोटे आश्वासन दिल्यावर तुमच्या घरावर आंदोलन करू. परंतु झालेल्या कॅबिनेट मंत्रिमंडळात दिव्यांगांचे मानधन एक रुपयाने देखील वाढविण्यात आले नाही. त्यासोबतच दिव्यांगांच्या प्रश्नावर बैठक देखील बोलविण्यात आली नाही.

मंत्री अब्दुल सत्तार यांनी कोरडे आश्वासन दिल्यामुळे राज्यातील लाखो दिव्यांग नाराज झाले असून आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ४ ऑक्टोबर रोजी मंत्री अब्दुल सत्तार यांच्या सिल्लोड येथील घरावर हजारो दिव्यांग आंदोलन करणार असल्याचे प्रहार अपंग क्रांती आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष शिवाजी गाडे यांनी जाहीर केले आहे.. दिव्यांगांच्या तोंडाला पाणी पुसणाऱ्या मंत्री अब्दुल सत्तार यांचा जाहीर निषेध करण्यासाठी राज्यातील हजारो दिव्यांगांनी सिल्लोड येथे निषेध आंदोलनाला उपस्थित राहावे असे आवाहन प्रहार अपंग क्रांती छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे. या आंदोलनाला स्वतः बच्चुभाऊ उपस्थित राहणार आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904